# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.05.2024** **वारःगुरुवार**

---

1.पुढील तीन वर्षांत भारताचा सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 7 टक्क्यांच्या जवळपास राहण्याचा जागतिक मानांकन संस्थेचा अंदाज.
2.हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या रुद्रम – दोन या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.
3.जागतिक आरोग्य संघटनेच्या मदतीनं औषध नियामक प्रणाली अधिक भक्कम करण्याचा भारताचा मानस.
4.मिझोराममध्ये भूस्खलनातील मृतांची संख्या 29 वर.
आणि
5.येत्या २४ तासांत दक्षिण-पश्चिम मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता.

**अर्थ व्यवस्था**

भारताचा अर्थव्यवस्थेचा दृष्टीकोन स्थिर ते सकारात्मक असा सुधारित असल्याचं एस अँड पी ग्लोबल रेटिंग या आर्थिक संशोधन करणाऱ्या संस्थेने म्हटलं आहे. सध्याच्या लोकसभा निवडणुकीच्या निकालाची पर्वा न करता आर्थिक सुधारणा आणि वित्तीय धोरणांमध्ये व्यापक सातत्य अपेक्षित राहील असंही या संस्थेने म्हटलं आहे. 26 सप्टेंबर 2014 पासून या संस्थेने भारताच्या अर्थव्यवस्थे बाबतचा दृष्टीकोन स्थिर ठेवून 10 वर्षांच्या अंतरानंतर हा दृष्टीकोन सकारात्मक राहीला आहे.

हा सकारात्मक दृष्टीकोन धोरणात्मक स्थिरता, सखोल आर्थिक सुधारणा आणि उच्च पायाभूत सुविधा गुंतवणूक दीर्घकालीन वाढीची शक्यता टिकवून ठेवेल. आर्थिक लवचिकता वाढवताना सरकारचे वाढलेले कर्ज आणि व्याजाचं ओझं कमी करणाऱ्या सावध वित्तीय आणि चलनविषयक धोरणाद्वारे, पुढील 24 महिन्यांत उच्च गुणांकन होऊ शकते असं या संस्थेने प्रसिद्ध केलेल्या एका निवेदनात म्हटलं आहे.

भक्कम आर्थिक वाढ, सरकारी खर्चाच्या गुणवत्तेत स्पष्ट सुधारणा, राजकोषीय एकत्रीकरणासाठी राजकीय बांधिलकी, पुढील तीन वर्षांत सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर 7 टक्क्यांच्या जवळपास राहील असंही एस अँड पी ग्लोबल रेटिंग या संस्थेने म्हटलं आहे. भारतातील पायाभूत सुविधा आणि संपर्क व्यवस्थेध्ये सुधारणा, आर्थिक वर्ष 2025 मध्ये सामान्य सरकारी तूट 6 पूर्णांक 8 टक्क्यांपर्यंत कमी होण्याची अपेक्षा असून ते 7 पूर्णांक 9 टक्क्यांपर्यन्त येईल असंही संस्थेने म्हटलं आहे.

**फ्लाईट**

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संघटनेने काल ओडिशामध्ये भारतीय हवाई दलाच्या तळावरून हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या रुद्रम – दोन या क्षेपणास्त्राची सुखोई-३० या विमानातून यशस्वी चाचणी केली. उड्डाण-चाचणीने सर्व चाचणी उद्दिष्टे पूर्ण केली असल्याचं संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे. रुद्रम – दोन ही स्वदेशी-विकसित क्षेपणास्त्र प्रणाली आहे. डीआरडीओच्या विविध प्रयोगशाळांनी विकसित केलेल्या अनेक अत्याधुनिक स्वदेशी तंत्रज्ञानाचा समावेश या क्षेपणास्त्र प्रणालीमध्ये करण्यात आला आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी रुद्रम – दोनच्या यशस्वी चाचणीबद्दल DRDO, भारतीय हवाई दल आणि संबंधित उद्योगांचे अभिनंदन केलं आहे. या यशस्वी चाचणीने सशस्त्र दलांची ताकद आणखी मजबूत झाल्याचं राजनाथसिंह यांनी म्हटलं आहे. डीआरडीओचे अध्यक्ष डॉ समीर व्ही कामत यांनी डीआरडीओच्या पथकाचे त्यांच्या अथक प्रयत्नांसाठी आणि यशस्वी उड्डाण चाचणीत योगदान दिल्याबद्दल कौतुक केलं आहे.

**निवडणूक आयोग**

निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणूक 2024 मध्ये कोणताही पात्र मतदार शारीरिक किंवा इतर अडथळ्यांमुळे त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये यासाठी तसेच त्यासंदर्भातील सर्वसमावेशकता आणि सुलभता सुनिश्चित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पावले उचलली आहेत. आयोगाने म्हटले आहे की, आतापर्यंत निवडणुकीच्या सहा टप्प्यांनंतर अपंग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी आणि विशेषत: असुरक्षित आदिवासी गट अशा विविध विभागातील मतदारांमध्ये प्रचंड उत्साह दिसून आला. 85 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक आणि 40 टक्के अपंगत्व असलेल्यासाठी घरून मतदान करण्याची सुविधा या निवडणुकीत प्रथमच उपलब्ध करून देण्यात आली. या सर्व गोष्टींची तयारी दोन वर्षांपासून सुरू झाली असल्याचं आयोगाने म्हटलं आहे. मतदार यादीतील पात्र नागरिकांची नावं अद्ययावत करणं आणि मतदार नोंदणी वाढवण्यासाठी विशेष नोंदणी मोहीम, शिबिरे आयोजित करण्यात आल्याची माहिती देत मतदानाच्या हक्कापासून वंचित राहण्याची शक्यता असलेल्या समुदायांमध्ये सहभाग वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाने बहुआयामी धोरण अवलंबले आहे.

**प्रचार**

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यातील प्रचार आज संध्याकाळी संपत असून, प्रचार शिगेला पोहोचला आहे. या टप्प्यात शनिवारी सात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश चंदीगडमध्ये पसरलेल्या ५७ लोकसभा मतदारसंघात मतदान होणार आहे. या टप्प्यात एकंदर 904 उमेदवार रिंगणात आहेत.

**भारत-हू**

जागतिक आरोग्य संघटनेच्या सहकार्याने भारत; सर्वांसाठी उच्च-गुणवत्तेच्या वैद्यकीय उत्पादने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने औषध नियामक प्रणाली अधिक भक्कम करण्याचा मानस असल्याचं केंद्रीय आरोग्य सचिव अपूर्व चंद्रा यांनी म्हटलं आहे. जिनिव्हा इथल्या 77 व्या जागतिक आरोग्य सभेच्या पूर्ण सत्राला संबोधित करताना चंद्रा बोलत होते. जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना म्हणून उभी असलेली प्रधानमंत्री जन आरोग्य योजना 300 दशलक्ष लाभार्थ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष सहा हजार अमेरिकन डॉलर्सचे आरोग्य कवच प्रदान करत असल्याची माहितीदेखील चंद्रा यांनी यावेळी दिली.

भारताने 1 लाख 60 हजाराहून अधिक आयुष्मान आरोग्य मंदिरे कार्यान्वित करून सार्वत्रिक आरोग्य अभियानाला चालना देण्यासाठी आयुष्मान भारत म्हणजे "लिव्ह लाँग इंडिया" ची सुरुवात केल्याचं त्यांनी सांगितलं. चंद्रा म्हणाले की, गेल्या दशकांमध्ये माता मृत्यूचे प्रमाण आणि बालमृत्यू दरामध्ये लक्षणीय घट दर्शवून भारत शाश्वत विकासाच्या गटाचे लक्ष्य गाठण्याच्या मार्गावर आहे. जागतिक सहकार्यासाठी भारत डिजिटल सार्वजनिक वस्तूंमध्ये दीपस्तंभ देश म्हणून उदयास आला असल्याचं चंद्रा यांनी म्हटलं आहे.

**भारत**

भारत-बांगलादेश वाणिज्यदूत स्तरावरील संवादाची चौथी फेरी काल नवी दिल्ली इथं पार पडली. पारपत्र आणि व्हिसा विभागाचे संयुक्त सचिव डॉ. अमन पुरी यांनी भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व केले, तर बांगलादेशच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयाचे महासंचालक रोकेबुल हक यांनी केलं.

दोन्ही बाजूंनी वाणिज्यदूत समस्या, व्हिसा प्रकरणे, प्रत्यावर्तन, परस्पर कायदेशीर सहाय्य करार आणि प्रत्यार्पण प्रकरणांवर समन्वय आणि सहकार्य मजबूत करण्यासाठी यंत्रणांवर यामध्ये व्यापक चर्चा करण्यात आली. दोन्ही देशांनी नागरिकांचं प्रवास सुलभ करण्यासाठी द्विपक्षीय सुधारित प्रवास व्यवस्था आणखी मजबूत करण्यावर सहमती दर्शवली. तर संवादाची पुढील फेरी ढाका इथं करण्याचं दोन्ही बाजूनी मान्य करण्यात आलं. भारत-बांग्लादेश वाणिज्यदूत संवाद यंत्रणा 2017 मध्ये स्थापन करण्यात आली होती.

**शांती**

भारतीय लष्कराद्वारे 76 वा संयुक्त राष्ट्र शांती सैनिकांचा आंतरराष्ट्रीय दिवस नवी दिल्ली येथील राष्ट्रीय युद्ध स्मारकावर वीरांना श्रद्धांजली अर्पण करून काल पाळण्यात आला. लेफ्टनंट जनरल राकेश कपूर यांच्यासह संयुक्त राष्ट्र, संरक्षण मंत्रालय आणि परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी या प्रसंगी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. संयुक्त राष्ट्रांच्या शांती स्थापनेत भारताचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. या शांती मोहिमेत भारताने आतापर्यंत 2 लाख 87 हजार सैनिक पाठवले आहेत. आतापर्यंत झालेल्या मोहिमांमधे 160 जवानांनी आपलं सर्वोच्च बलिदान दिलं आहे. नवी दिल्लीतील संयुक्त राष्ट्र शांती केंद्रामधून दरवर्षी १२ हजारांहून अधिक सैनिकांना प्रशिक्षण दिले जाते.

**CUET**

संयुक्त विद्यापीठ प्रवेश परीक्षा काल घेण्यात आली. दिल्ली, फरीदाबाद, गुरुग्राम, नोएडा आणि गाझियाबाद इथल्या केंद्रांवर घेण्यात आलेल्या परीक्षेसाठी 1 कोटी 52 लाख उमेदवार उपस्थित होते. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने एका निवेदनात म्हटले आहे की, काल कानपूर, इंदूर, गोवा आणि सिवान या शहरांमध्ये विशिष्ट विषयातील काही प्रभावित उमेदवारांसाठी " नॉलेज ट्रेडिशन आणि प्रॅक्टिसेस इन इंडिया " या विषयाची परीक्षा घेण्यात आली. बंगाली आणि पर्यावरण अभ्यास चाचणी परीक्षेसाठी सिलचर क्षेत्रा बाहेरील केंद्रांवर बसण्यात अडचणी येत असलेल्या उमेदवारांसाठी सिलचर इथं परीक्षा आयोजित करून विद्यार्थ्यांसाठी सक्रिय पावले उचलण्यात आली आहेत.

**चुकीचे तापमान**

भारतीय हवामान खात्याने दिल्लीतील मुंगेशपूर क्षेत्राबाबत एक स्पष्टीकरण जारी केले आहे. इथल्या स्वयंचलित हवामान केंद्रावरील सेन्सरमधील त्रुटी किंवा स्थानिक घटकामुळे तेथील तापमान 52 पूर्णांक 9 अंश सेल्सिअस दर्शविण्यात आलं होतं. हवामान विभाग संबंधित यंत्राची तपासणी करत आहे. दरम्यान मुंगेशपूरच्या सर्वोच्च तापमानाची माहिती अद्याप अधिकृत आली नसल्याचं पृथ्वी विज्ञान मंत्री किरेन रिजिजू यांनी स्पष्ट केले आहे. हवामान विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना या घटनेची पडताळणी करण्यास सांगितलं असून लवकरच अधिकृत माहिती हाती येईल असं रिजिजू यांनी एका समाज मध्यमाद्वारे म्हटलं आहे.

**REMAL: MIZORAM DEATH TOLL**

मिझोरामच्या आयझॉल जिल्ह्यात दोन ठिकाणी आणखी दोन मृतदेह सापडल्यानंतर अनेक भूस्खलनातील मृतांची संख्या 29 वर पोहोचली आहे. आयझॉलचे पोलिस अधीक्षक राहूल अलवाल यांनी सांगितलं की, जिल्ह्याच्या दक्षिणेकडील सीमेवर असलेल्या मेल्थम आणि हलिमेन भागात प्रत्येकी एक मृतदेह ढिगाऱ्यातून सापडला आहे. 29 बळींपैकी 23 मिझोरमचे रहिवासी आहेत, तर पाच लोक झारखंडचे आहेत आणि एक आसामच्या सिलचर शहरातील आहे, असंही अलवाल यांनी सांगितलं. शहराच्या पश्चिमेकडील हुंथर इथं राष्ट्रीय महामार्ग-6 वर भूस्खलन झाल्यामुळे राजधानी आयझॉलचा देशाच्या इतर भागांपासून काही तास संपर्क तुटला होता. 150 हून अधिक घरं, झाडं आणि विजेचे खांब कोसळले आहेत. रेमल चक्रीवादळाच्या परिणामामुळे संपूर्ण मिझोराममध्ये हानी झाली असून, अनेक रस्ते उखडले गेले आणि 50 हून अधिक घरे पाण्याखाली गेली.

**मॉन्सून**

येत्या २४ तासांत दक्षिण-पश्चिम मान्सून केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे. भारतीय हवामानशास्त्र विभागानं सांगितलं की, मान्सून एक जून या सामान्य सुरुवातीच्या तारखेच्या दोन दिवस आधी येईल. दक्षिण अरबी समुद्र, मालदीव आणि कोमोरिन, लक्षद्वीप, केरळ आणि बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये नैऋत्य मान्सून पुढे जाण्यासाठी परिस्थिती देखील अनुकूल होत आहे अशी माहिती हवामानशास्त्र विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी आकाशवाणीला दिली.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार.